कार्यासनातील प्रकरणनिहाय सादरीकरणाचे तीन स्तर निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

कार्यालयीन आदेश क्रमांक : संकिर्ण १२१७/सी-१११/पोल-०९

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०३ मार्च, २०१८.

संदर्भ :-१) शासन अधिसूचना, सा.प्र.वि., क्रमांक : एसआरव्ही २००४/ प्रक्र.१५/०४/१२, दि.२५/५/२००६.
२) शासन अधिसूचना, सा.प्र.वि., क्रमांक : पीओडी १००७/प्र.क्र.९/१८(र.व.का.), दि.१४/११/२०१३.
३) शासन परिपत्रक, सा. प्र. वि., क्रमांक : संकिर्ण२०१२/प्र.क्र.५४/१८ (र.व.का.), दिनांक ११/८/२०१४.

कार्यालयीन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ दि. २५/५/२००६ च्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९, पोटकलम (१) व (२) अन्वये प्रत्येक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी दुय्यम अधिकाऱ्यास अंतिम निर्णय घेण्यासाठी शक्ती प्रदान करावयाच्या आहेत. तसेच सदर अधिनियमांतर्गत महाराष्ट्र शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम, २०१३ दि. १४/११/२०१३ अन्वये अधिसूचित करण्यात आला असून त्यामधील नियम ६ नुसार अंतिम निर्णय घेण्यासाठी अधिकारांचा स्तर निर्धारीत करणे आवश्यक आहे. सदर नियमांच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दि .११/०८/२०१४ च्या परिपत्रकान्वये प्रत्येक विभागाशी/कार्यालयाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्याचे तीन स्तर निश्चित करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने या कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या तक्यात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहे. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक निर्णयाच्या बाबींच्या प्रकरणात दि.११/०८/२०१४ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३०३१२१३५९१३२९ असा आहे. हा कार्यालयीन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhanudas B. Ingale

Digitally signed by Bhanudas B. Ingale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f8f9b8078a26fcd5e6693203d1bf5c64b5230b5886b5a2a443daceb6d447c6dc, cn=Bhanudas B. Ingale
Date: 2018.03.03 16:01:43 +05'30'

(भा. बा. इंगळे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग.

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
३) सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) उप सचिव (१८ र.व.का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवड नस्ती (पोल-९).

गृह विभाग/पोल-९

(शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १२१७/सी-१११/पोल-०९, दि. ०३ मार्च, २०१८ चे जोडपत्र)

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९, पोटकलम (१) व (२) व नियम, २०१३ नियम ६ अंतर्गत कार्यासनांशी संबंधित बाबींवर निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे निर्धारित केलेले तीन स्तर.

अ.क्र.	विषय	उप विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश/प्रमाणपत्र निर्गमित करण्यास सक्षम प्राधिकारी
			प्रथम	व्दितीय	तृतीय		
१.	शस्त्रे, दारुगोळा हत्यारे व दारु गोळा	१) शस्त्र परवाना क्षेत्रवाढ (विशेष प्रवर्ग वगळून भारतभर करणे.) (विशेष प्रवर्ग खालीलप्रमाणे आहेत: (१) विद्यमान केंद्रिय मंत्री/संसद सदस्य, (२) लष्करी, निमलष्करी कर्मचारी, (३) अखिल भारतीय सेवा करणारे अधिकारी, (४) भारतात सर्वत्र सेवा करण्यासाठी दायित्व असलेले अधिकारी, (५) समर्पित खेळाडू आणि शस्त्र नियम, २०१६ नियम ४०, उप नियम (२) मधील अनुक्रमांक १-४ मधील खेळाडू.)	सहायक कक्ष अधिकारी/ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	मा. मुख्यमंत्री	कक्ष अधिकारी
		२) शस्त्र व दारुगोळा खरेदी-विक्री व दुरुस्ती परवाना (नमुना- VIII मधील)	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	मा. मुख्यमंत्री	उप सचिव
		३) हवाई शस्त्र उत्पादन परवाना (नमुना-७ (सी) मधील)	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	मा. मुख्यमंत्री	उप सचिव
		४) शस्त्र खरेदी व विक्री साठ्यात/कोटयात वाढ करण्याबाबत	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	मा. मुख्यमंत्री	उप सचिव

		५) शस्त्र परवाना अपिल	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	मा. राज्यमंत्री (गृह-शहरे)	मा. राज्यमंत्री (गृह-शहरे)	कक्ष अधिकारी
		६) शस्त्र विक्री/हस्तांतर करीता अनामत कालावधीत वाढ	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	प्रधान सचिव (विशेष)	कक्ष अधिकारी
२.	विस्फोटक अधिनियम,१८८४ व नियम,२००८	सदर अधिनियम व नियमाच्या अनुषंगाने येणारे विषय	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	प्रधान सचिव (विशेष)	कक्ष अधिकारी
३.	पेट्रोलियम अधिनियम, १९५४	सदर अधिनियमांच्या अनुषंगाने येणारे विषय	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	प्रधान सचिव (विशेष)	कक्ष अधिकारी
४.	बॉम्ब स्फोट (सर्व प्रकरणाची साधने वापरून) विस्फोटक पदार्थ अधिनियम,१९०८ व बेकायदेशिर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम,१९६७	सदर अधिनियमांच्या अनुषंगाने येणारे विषय.	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)	प्रधान सचिव (विशेष)	कक्ष अधिकारी
५.	सिव्हील प्रोसीजर कोड मधील कलम ८० अन्वये नोटीस हाताळणे.	सिव्हील प्रोसीजर कोड मधील कलम-८० च्या अनुषंगाने येणारे विषय	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	-	उप सचिव	कक्ष अधिकारी

६.	खटल्यासंबंधी बाबी उदा.खटला तहकुबीसाठी झालेला खर्च वसुल करण्याबाबत न्यायालयाने मंजूर केलेले आर्थिक भरपाईबाबत, मुद्देमालाचे अनामत रक्कम देणे बाबत.	खटल्यासंबंधी बाबी उदा.खटला तहकुबीसाठी झालेला खर्च वसुल करण्याबाबत न्यायालयाने मंजूर केलेले आर्थिक भरपाईबाबत, मुद्देमालाचे अनामत रक्कम देणे बाबत.-	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)/ अप्पर मुख्य सचिव	प्रधान सचिव (विशेष))/ अप्पर मुख्य सचिव	कक्ष अधिकारी
७.	न्यायालयीन प्रकरणे	सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयातील प्रकरणे	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)/ अप्पर मुख्य सचिव	प्रधान सचिव (विशेष))/ अप्पर मुख्य सचिव	उप सचिव
८.	विधीमंडळ कामकाज	विधीमंडळ कामकाजाच्या अनुषंगाने उपस्थित होणारे प्रश्न	स.क.अ./ कक्ष अधिकारी	उप सचिव	प्रधान सचिव (विशेष)/ अप्पर मुख्य सचिव	मा. राज्यमंत्री(गृह)	कक्ष अधिकारी